मा.न्या.श्री.के.यु.चांदीवाल,अध्यक्ष,महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई मुख्यपीठ यांची सुधारित वेतननिश्चिती करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.एमआरटी-२०१९/प्र.क्र.५९/ज-१अ
हुतात्मा राजगुरु चौक, मादामा कामा रोड
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ६ मे, २०१९

संदर्भ : १.शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एमआरटी-१००७/प्र.क्र.८९/टी-१, दिनांक १/२/२००८

२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एमआरटी-१००७/प्र.क्र.८९/टी-१, दिनांक १७/३/२०१२

३. महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना क्रमांक म.म.न्या.२०१५/प्र.क्र.२६९/टी-१, दिनांक १२/४/२०१७

४. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांच्या कार्यालयाचे क्र.ममन्या/आस्था/केयुसी/अध्यक्ष/मुंबई/वेतननिश्चिती/२०१७, दि.२३/५/२०१७ चे आदेश

५.महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांच्या कार्यालयाचे क्र.ममन्या/आस्था/अध्यक्ष/मुंबई/वेतननिश्चिती/ २०१८, दि.६/१२/२०१८चे पत्र

६.महालेखापाल (लेखा व हकदारी)-II, महाराष्ट्र, नागपूर यांचे पत्र क्र.CCCell/HCJ/OC-०२/२०१३-१४/२८४, दि.२४/५/२०१८

शासन निर्णय :-

मा.न्या.श्री.के.यु.चांदीवाल, मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ (सेवानिवृत्त) यांची महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ (१९६६ चा महाराष्ट्र ४१) मधील कलम ३११ (१) मधील तरतुदीनुसार कलम ३२५ मधील अधिकारांचा वापर करुन विहित केलेल्या महाराष्ट्र जमीन महसूल (महसूल न्यायाधिकरण) नियम,२००७ मधील नियम ४(१) अनुसार, तसेच महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे “अध्यक्ष” व “सदस्य” यांच्या नियुक्ती संबंधीच्या मा.उच्च न्यायालयाच्या संमतीने तयार केलेल्या कार्यपध्दती अनुसार अध्यक्ष, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई या पदावर संदर्भांकित क्र.३ दिनांक १२/४/२०१७ च्या अधिसूचनेद्वारे नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांची नियुक्ती ३ वर्षे किंवा त्यांच्या वयाच्या ७० वर्ष पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत करण्यात आलेली आहे. मा.न्या.श्री.के.यु.चांदीवाल, मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ (सेवानिवृत्त) यांनी सदरहू पदाचा कार्यभार दिनांक २/५/२०१७ (म.पू.) स्विकारला आहे.

०२. केंद्रीय पेन्शन लेखा कार्यालय, नवी दिल्ली यांनी मा.न्या.श्री.के.यु.चांदीवाल, मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ (सेवानिवृत्त) यांचे शेवटचे वेतन रु.८०,०००/- (नियत) एवढे निश्चित करुन त्यांना दिनांक २/५/२०१७ पासून रु.४०,०००/- एवढे सेवानिवृत्ती वेतन निश्चित केले आहे. त्यानुसार, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन)नियम १५७ (२) (डी) (दोन) मधील अटींच्या अधीन राहून संदर्भ क्र.४ येथील दि.२३/५/२०१७ च्या

आदेशान्वये, रु.४०,०००/-इतके अध्यक्ष, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण या पदासाठी वेतन निश्चित करण्यात आले होते.

०३. मा.न्या.श्री.के.यु.चांदीवाल यांच्या निवृत्तीवेतनात महालेखापाल (लेखा व हकदारी)-॥ नागपूर यांनी संदर्भ क्र.६ दि.२४/५/२०१८ च्या पत्रान्वये सुधारणा केली आहे. त्यानुसार, त्यांचे सुधारित वेतन रु.२,२५,०००/- इतके निश्चित करण्यात आले असून त्यांचे दिनांक १/१/२०१६ रोजीचे निवृत्तीवेतन रु.१,१२,५००/- इतके निश्चित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने, मा.न्या.श्री.के.यु.चांदीवाल यांचे सदर पदावरील रु.२,२५,०००/- इतके वेतन विचारात घेऊन , महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम,१९८२ च्या नियम १५७ (२) (डी) (दोन) मधील अटींच्या अधीन राहून त्यांचे दिनांक १/१/२०१६ पासून अध्यक्ष, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुख्यपीठ मुंबई या पदासाठीचे खालीलप्रमाणे सुधारित वेतन निश्चित करण्यात येत आहे.

अ.क्र.	वेतननिश्चितीसंदर्भातील तपशील	वेतननिश्चिती (रुपयात)
१	मा.न्या.श्री.के.यु.चांदीवाल, मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ (सेवानिवृत्त) यांचे दि.१/१/२०१६ रोजीचे निश्चित करण्यात आलेले वेतन (दरमहा)	२,२५,०००/-
२	मा.न्या.श्री.के.यु.चांदीवाल, मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ (सेवानिवृत्त) यांना देय निवृत्तीवेतन (दि.१/१/२०१६ रोजी)	१,१२,५००/-
३	मा.न्या.श्री.के.यु.चांदीवाल यांचे अध्यक्ष, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई मुख्यपीठ या पदासाठी फेर नियुक्तीनंतर निश्चित होणारे वेतन (दरमहा)	१,१२,५००/-
		(रुपये एक लक्ष बारा हजार पाचशे फक्त)

०४. संचालक, लेखा व कोषागारे यांच्यामार्फत वेतन पडताळणी पथकाकडून सदर वेतननिश्चितीची पडताळणी करण्याबाबतची कार्यवाही प्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांनी करावी.

०५. मा.न्या.श्री.के.यु.चांदीवाल यांनी दिलेल्या वचनपत्रानुसार, चुकीच्या वेतन निश्चितीमुळे किंवा भविष्यात वेतननिश्चितीमध्ये विसंगती आढळून आल्यामुळे वेतन व अनुषंगिक भत्त्यांची रक्कम अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याची वसूली भविष्यात प्रदान करण्यात येणाऱ्या वेतनाच्या रकमेतून किंवा इतर प्रकारे आवश्यक वाढल्यास निवृत्तीवेतनामधून वसूल करण्यात येईल. सुधारित वेतन निश्चितीमुळे वेतनातील फरकाबाबत आवश्यक ती कार्यवाही, उप प्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई मुख्यपीठ यांनी करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

०६. यासाठी होणारा खर्च हा -"मागणी क्रमांक सी-४, २०५२- सचिवालयीन सर्वसाधारण सेवा (०४) (०९९) महसूल मंडळ, (००) (०१) महसूल मंडळ (२०५२ ०२२१) " या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या वित्तीय वर्षात मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात येईल.

०७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५०६१२३५१६१९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sunil Shridhar Kothekar

Digitally signed by Sunil Shridhar Kothekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a4e83b3f4c3a086b626255c2b2cb37acdeb67b59b5e9ecbb4d25b60ccef2c660, cn=Sunil Shridhar Kothekar
Date: 2019.05.06 16:05:03 +05'30'

(सुनील कोठेकर)
शासनाचे अवर सचिव

प्रत अग्रेषित :-

(१) मा.राज्यपालांचे सचिव
(२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई .
(३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
(४) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
(५) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद
(६) सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य,
(७) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
(८) अध्यक्ष, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई,
(९) विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नागपूर व औरंगाबाद
(१०) प्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई.
(११) उपप्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, औरंगाबाद/नागपूर/पुणे
(१२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई /नागपूर
(१३) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
(१४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
(१५) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
(१६) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
(१७) ई-८ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
(१८) निवडनस्ती, ज-१ अ कार्यासन,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२